महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

(गृह शाखा)

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001

**दुरध्वनी क्रमांक** - 0257- 2220152 **ई मेल** - homebranchjalgaon@gmail.com

---

**वाचले :-** 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा,2005

2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897

3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील अधिसुचना करोना2020/प्रक्र.58/आरोग्य 5 दिनांक 14 मार्च, 2020

4. या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/कावि/2020/156, दिनांक 19 एप्रिल, 2020

5. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 2 मे, 2020 व दिनांक 03 मे, 2020

6.या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/कावि/2020/186, दिनांक 03 मे, 2020

-----0000-----

क्र दंडप्र-01/कावि/2020/ 195 दिनांक 09 मे, 2020

**आदेश :-**

ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च, 2020 अन्वये करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतूदीच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, जागतीक आरोग्य संघटनेने करोना विषाणूमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषित केलेला आहे. तसेच करोना विषाणूचा प्रसार जळगांव जिल्हयात गतीने पसरत आहे असे दिसून येत आहे, यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणू संसर्गात अधिक वाढ होऊ न देता उपाययोजना राबवणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, जळगांव जिल्हयातील कोव्हिड-19 पॉझिटिव्ह रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून अद्यापही नागरीकांची सार्वजनिक ठिकाणी होणारी गर्दी कमी होत नाही. नागरीक अनावश्यकरीत्या रस्त्यावर फिरतांना दिसून येत आहेत. तसेच Containment Zone मध्ये देखील वेळोवेळी सुचना देवूनही नागरीक Social Distancing चे पालन व अन्य खबरदारी घेतांना दिसून येत नसल्याचे माझे निदर्शनास आलेले आहे.

त्याअर्थी, त्याअर्थी, जळगांव जिल्हयात करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनांचा भाग म्हणून **मी, डॉ. अविनाश ढाकणे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव** आपत्ती कायदा 2005 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन **दिनांक 10 मे, 2020 पासून दिनांक 17 मे, 2020 पावेतो** खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

1) **जळगांव शहर महानगरपालिका जळगांव, चोपडा नगरपालिका, अमळनेर नगरपालिका, भुसावळ नगरपालिका, पाचोरा नगरपालिका यांच्या कार्यक्षेत्रातील केवळ अत्यावश्यक वस्तू व सेवा (Essential Commodities- उदा. अन्न, औषधे ) पुरविणा-या आस्थापना / दुकाने / यंत्रणा सकाळी 07.00 ते सायंकाळी 07.00 या वेळेतच सुरु राहतील.**

Scanned with CamScanner

2) **वर नमूद केल्यानुसार अत्यावश्यक वस्तू व सेवा (Essential Commodities) पुरविणा-या आस्थापना / दुकाने / यंत्रणा वगळता अन्य कोणत्याही प्रकारचे दुकाने / आस्थापना / यंत्रणा सुरु ठेवता येणार नाहीत.**

3) **उपरोक्त नमूद कार्यक्षेत्रातील पेट्रोल / डिझेल पंप केवळ सकाळी 07.00 ते सायंकाळी 07.00 या वेळेतच सुरु राहतील. तथापि महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायत क्षेत्राबाहेरील राष्ट्रीय महामार्ग व राज्य मार्गावरील पेट्रोल / डिझेल पंपांना सदरची अट लागू असणार नाही.**

4) **उक्त नमूद क्षेत्रातील रेशनचा पुरवठा करणारी स्वस्त धान्य दुकाने, कृषीशी संबंधित सर्व दुकाने सुरु राहतील.**

5) **सदरचा आदेश हा लॉकडाऊन कालावधीमध्ये सुरु ठेवण्याकरीता एमआयडीसी प्राधिकरणाने मंजूरी दिलेल्या कंपन्या / इंडस्ट्रीज / औद्योगिक संस्था / उद्योग यांना लागू असणार नाही. तथापि कोणत्याही उद्योग / आस्थापनांना Containment Zone म्हणून घोषित करण्यात आलेल्या क्षेत्रामधील कामगार / कर्मचारी यांना कामावर घेता येणार नाही.**

6) **उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे अत्यावश्यक वस्तू व सेवा यांची दुकाने सुरु ठेवतांना दुकानांमधील काऊंटरवर केवळ एकच व्यक्ती राहील, अन्य सर्व व्यक्ती दुकानाच्या बाहेर Social Distancing चे पालन करुन रांगेत उभे राहतील, याची दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित दुकानदारांची राहील. तथापि सदर बाबीचा भंग केल्यास कसूरदार दुकान हे दिनांक 17 मे, 2020 पर्यंत तात्काळ बंद करण्याची कार्यवाही संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांनी करावी.**

उक्त नमूद कार्यक्षेत्राकरीता कोव्हिड-19 विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्याच्या पार्श्वभुमीवर या आदेशातील नमूद बाबीं शिथील न करता अधिक कडक प्रतिबंधात्मक उपाययोजना आवश्यक असल्यास संबंधित 'Incident Commanders' त्या त्या कार्यक्षेत्रात आवश्यकतेनुसार उपाययोजना त्यांचे स्तरावर राबवू शकतील. तसेच संबंधित क्षेत्रातील लोकांना / नागरीकांना स्वयंस्फुर्तीने जनता कर्फ्यू सारखे उपक्रम राबविल्यास निश्चितच कोव्हिड-19 विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यास मदत होईल, याबाबत स्थानिकांच्या सहकार्याने निर्णय घेण्यात यावेत.

सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास सदर बाब ही आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005, भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, 1897 नुसार शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश हा आज दिनांक 09/05/2020 रोजी माझ्या सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

जिल्हा दंडाधिकारी जळगांव

**(डॉ. अविनाश ढाकणे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव**

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. पोलीस अधिक्षक जळगांव
2. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव
3. उपविभागीय दंडाधिकारी सर्व
4. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ जळगांव
5. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव
6. जिल्हा शल्य चिकीत्सक, जळगांव
7. कार्यकारी दंडाधिकारी सर्व
8. मुख्याधिकारी, नगरपालिका / नगरपरिषद सर्व

**प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी जळगांव** यांनी सदर आदेशाचे स्थानिक वर्तमानपत्रातून विनामुल्य प्रसि

**प्रत :- जिल्हा विज्ञान व सुचना अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे jalgaon.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यबाबतची कार्यवाही करावी.

Scanned with CamScanner